# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )

जा. क्र. शातंको / शै.स.क./सत्र २३-२४/151 दिनांक:- २१ मार्च २०२४

**महत्वाचे परिपत्रक**

**विषय:** प्रथम व द्वितीय सत्राकरीता समकक्ष विषयाबाबत

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नविन अभ्यासक्रम MPEC2023 टप्प्या टप्प्याने राबविण्यात येत असून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हा नविन अभ्यासक्रम लागू होईल.

जुना अभ्यासक्रम MPEC2020 व त्यापूर्वीचे विद्यार्थी प्रथम व द्वितीय सत्राच्या विषयामधे अनुत्तीर्ण झालेले असल्यास जुन्या अभ्यासक्रम MPEC2020 नुसार परीक्षा देतील. हे विद्यार्थी अभ्यासक्रम बदलल्यानंतर दोन परीक्षे नंतर नविन अभ्यासक्रमनुसार (Equivalent Subject नुसार) परीक्षा देतील. त्यामुळे प्रथम सत्राच्या MPEC2020 च्या विषयाच्या प्रश्न पत्रिका पुढील दोन परीक्षा (Summer 2024, Winter 2024) पर्यन्त काढण्यात येतील. मात्र नंतर प्रथम सत्र MPEC2020 चे Question Paper काढण्यात येणार नाहीत. त्यामुळे Summer 2025 पासून टप्प्या टप्प्याने MPEC2020 व त्यापूर्वीचे अभ्यासक्रम यांचे Question Paper काढणे बंद होऊन MPEC2020 व त्यापूर्वीचे अनुत्तीर्ण विद्यार्थी MPEC2023 च्या Equivalent विषयाची परीक्षा देतील.

MPEC2020 मधील व त्यापूर्वीचे जूने विद्यार्थी उन्हाळी परीक्षा २०२४ (Summer 2024) परीक्षेत MPEC2020 प्रमाणे पेपर देतील.

ज्या विद्यार्थ्यांचे MPEC2020 अभ्यासक्रमातील सत्र कर्म पूर्ण झाले नाही अशा विद्यार्थ्यांनाही टप्प्या टप्प्याने सुधारित अभ्यासक्रमामधे प्रवेश घेउन अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असते. मूलतः प्रवेशित scheme मध्ये विद्यार्थ्यांना ते ते सत्र उत्तीर्ण व्हावे लागेल. Scheme बदलामुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही Backlog (आगावू) विषयाची परीक्षा द्यावी लागणार नाही. तसेच कोणत्याही विषयासाठी सूट (Exemption) मिळणार नाही. जुन्या Scheme मधील विषयांसाठी अनुत्तीर्ण झालेले विद्यार्थी उपलब्ध संधीमधे उत्तीर्ण झाले नाहीत तर अशा विषयांकरिता नविन Scheme मधील संस्थेने वेळोवेळी जाहीर केलेल्या समकक्ष विषयांची परीक्षा देतील.

सर्व विभाग प्रमुखानी सर्व संबंधित विद्यार्थ्यांना आपले स्तरावरून याची जाणीव करून द्यावी व योग्य ती कार्यवाही करावी.

डॉ. डी. एम. गर्गे
प्र. प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर